जनसंपर्क कक्ष
30 APR 2026 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिओ इन्फॉरमॅटिक्सच्या विद्यार्थ्यांची निकालापूर्वीच नामांकित कंपन्यांत निवड

**। कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागांतर्गत चालणाऱ्या 'एम.एस्सी. जिओ इन्फॉरमॅटिक्स' अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानकौशल्याच्या जोरावर आकर्षक रोजगारसंधींना गवसणी घातली आहे. २०२३ पासून सुरू झालेल्या या विशेष अभ्यासक्रमाच्या सात विद्यार्थ्यांनी आपली पदव्युत्तर पदवी पूर्ण करण्यापूर्वीच नामांकित राष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये स्थान प्राप्त करून विद्यापीठाचा लौकिक वाढवला आहे.

या प्लेसमेंट मोहिमेंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना देशातील विविध महत्त्वाच्या शहरांमध्ये काम करण्याची संधी मिळणार आहे. या विद्यार्थ्यांची नावे आणि कंसात निवड करणारी कंपनी यांची नावे पुढीलप्रमाणे : श्रद्धा नाईकबा यादव (स्कायलार्क ड्रोन्स कंपनी, बंगळूर) निकिता राजेंद्र जाधव (आयमेरिट टेक्नॉलॉजी, पुणे), शेखर मुत्तप्पा कांबळे (अर्थयार्ड इन्फोटेक, राजस्थान), शुभम रामचंद्र पाटील (जिओ-इन्फो सर्व्हिसेस, नवी मुंबई), मोहिनी राजाराम सुतार (ॲटलास जिओ ग्राफिक डेटा प्रा. लि., पुणे) निर्मिती वैभव दुरे (एल.ई.ए. असोसिएटस् साऊथ एशिया प्रा. लि., मुंबई), राहुल गोसावी (टेरा इन्फॉर्मेटिक सर्व्हिसेस, पुणे). यातील काही विद्यार्थ्यांना वार्षिक ६ लाख रुपयांपर्यंतचे आकर्षक पॅकेज मिळाले आहे. या सर्व विद्यार्थ्यांनी आपली अंतिम सत्राची परीक्षा नुकतीच दिली असून, परीक्षेचा निकाल जाहीर होण्यापूर्वीच त्यांना या नामांकित कंपन्यांकडून नियुक्ती पत्रे प्राप्त झाली आहेत.

यासंदर्भात डॉ. सचिन पन्हाळकर म्हणाले, विद्यार्थ्यांच्या या यशाचे मुख्य गमक म्हणजे विभागाचा 'उद्योग-केंद्रित' अभ्यासक्रम आहे. आजच्या युगात जिओ-स्पेशियल डेटा, ड्रोन तंत्रज्ञान आणि रिमोट सेन्सिंग या क्षेत्रांची वाढती मागणी लक्षात घेऊनच हा अभ्यासक्रम तयार केला आहे. विद्यार्थ्यांना डॉ. अभिजित पाटील, डॉ. पी. टी. पाटील, डॉ. व्ही. ए. चौगुले, डॉ. सुधीर पवार आणि शुभम गिरीगोसावी यांचे मार्गदर्शन लाभले.

30 APR 2026

जॅनप्रथा.स

# १४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा विद्यापीठातर्फे सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल - २०२६ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा १ एप्रिलपासून व्यवस्थितपणे सुरु झालेल्या आहेत. गुरुवारी २९ एप्रिलरोजी विविध १४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने १८५ परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी २३०७४ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, २९ एप्रिलरोजी भरारी पथकाकडून कोल्हापूर जिल्ह्यातून सहा गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद झाली आहे.

या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली. २९ एप्रिलरोजी सदर पथकाकडून कोल्हापूर जिल्ह्यातून सहा गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत केली आहे. सातारा, सांगलीतून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे केली नाही.या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. तसेच सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

30 APR 2026
पुढारी

# उन्हाळी सत्र परीक्षेला 25 हजार विद्यार्थ्यांची उपस्थिती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षेला मंगळवारी 24 हजार 808 विद्यार्थी उपस्थित होते. सध्या विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत सुरू आहेत. मंगळवारी बी.कॉम., बी.ए., बी.बी.ए., बी.एस्सी., एम.बी.ए., एम.ए., एम.एस्सी., बी.एस.डब्ल्यू., एम.सी.ए., बॅचलर ऑफ लॉ (तीन व पाच वर्षे), डिप्लोमा इन गांधीयन स्टडीज, सर्टिफिकेट कोर्स इन रशियन लँग्वेज यांसह एकूण 101 अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने 194 केंद्रांवर घेण्यात आल्या. दरम्यान, विद्यापीठाने 28 तारखेला बी.आय.डी., बी.व्होक., नर्सिंग अँड हॉस्पिटॅलिटी या चार अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले आहेत. आतापर्यंत एकूण 14 अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी नेमलेल्या भरारी पथकांनी कोल्हापूर जिल्ह्यात 1 आणि सांगली जिल्ह्यात 3 अशा एकूण 4 गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद केली आहे. या प्रकरणांची पुढील कार्यवाही परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात येणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.